# जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभा दि. १५.०२.२०२४ चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा मा.श्री.रघुनाथ गावडे (भाप्रसे), मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दि.१५.०२.२०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, परभणी येथे संपन्न झाली. सभेच्या सुरवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. सदर सभेस निर्यात प्रचालन कार्यालय, औरंगाबाद येथील एक्सपर्ट श्री.अमोल मोहिते हे उपस्थित होते. त्यांनी जिल्हयातील निर्यात वाढविण्याबाबत सविस्तर माहिती दिली.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती मध्ये जिल्हयाच्या निर्यातीबाबत सदस्य सचिव यांनी माहिती दिली.

जिल्हयामध्ये मे.कोहीनुर रोप्स्, सेलू व मे.रिलायबल अॅग्रो फुड, पुर्णा हे निर्यातदार दोन उद्योजक असून त्यांचे मार्फत प्लास्टीक रोप्स् व बोनलेस बिफ निर्यात केली जातात. जिल्हयात कृषि मालावर आधारीत जसे ऊस, कापूस, ज्वारी, गुळ, सरकी तेल, हळद, कडधान्ये, सोयाबीन, दुग्धजन्य पदार्थ इ. उत्पादने घेतली जातात. एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत जिल्हयाकरीता हरभरा व गुळ ही दोन उत्पादने निवडण्यात आली आहेत. त्यानुषंगाने कृषि मालावर आधारीत उत्पादनांची निर्यात वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

जिल्हयाच्या निर्यातीस चालना मिळावी याकरीता डीजीएफटी पुणे यांचे सहकार्याने दि.०३.११.२०२३ रोजी ईग्नाईट महाराष्ट्र अंतर्गत जिल्हयातील निर्यातदार, नव उद्योजक, शेतकरी उत्पादन गट, स्वंयसहायता बचतगट यांची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तसेच दि.२३.१२.२०२३ रोजी कॉर्नेल महाराष्ट्र-६० अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत उद्योजक, नव उद्योजक, तृतीय व अंतिम वर्षातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

निर्यातबंधू योजनेद्वारे डीजीएफटी पुणे जागतिक बाजारपेठेत उत्पादनांची स्पर्धात्मकता वाटविण्याबाबत निर्यात सुलभ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. योजने अंतर्गत नवउद्योजक निर्यातकांना समुपदेशन, प्रशिक्षण व आऊटरीच कार्यक्रमाद्वारे परकीय व्यापारातील गुंतागुंत यासह जिल्हा निर्यात हब्स व पार्टनरसह अन्य भागीदारी, व्हायब्रंट जिल्हा उत्पादन बाजार संबंधीत परिसंस्था तयार करण्यासाठी प्रयत्न करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे. डीजीएफटीने ऑनलाईन आयईसी आयात निर्यात कोड अर्ज प्रक्रीया सुलभ केली असून ती व्यापार आणि निर्यातीसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी सहायक ठरते. तसेच व्यवहारात कपात करुन व्यवसाय सुलभता, पेपरलेस नियामक वातावरण, पारदर्शक आणि भाकीत करण्यायोग्य कायदेशीर व्यवस्था, आयात निर्यात संबंधीत कायदे, नियम, धोरण व प्रक्रीया इ.माहिती डीजीएफटी पोर्टल https://dgft.Nov.in/ वर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच डीजीएफटी द्वारे नियुक्त एजन्सीद्वारे प्राधान्य/गैरप्राधान्य प्रमाणपत्र जारी करण्यासाठी एक समान डीजीटल प्लॅटफॉर्म तयार केला असून कोणत्याही भौतिक इंटरफेस शिवाय ऑनलाईन वातावरणात निर्गमीत केली जात आहेत.

निर्यातदारांच्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयात निर्यात प्रचालन कक्षाची सुरवात करण्यात आल्याबाबत सभागृहास माहिती देण्यात आली. मा.जिल्हाधिकारी यांनी जिल्हयातील सर्व निर्यातदार उद्योग घटकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच जिल्हयात निर्यातीस चालना मिळावी व त्यात वाढ होण्याकरीता निश्चित असा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा. यामध्ये उद्योजकांच्या मागणीनुसार निर्यात मालाच्या अनुषंगाने स्वंतत्र असे मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करावेत असे सांगितले.

केंद्र सरकारच्या नियमानुसार निर्यातक्षम असलेल्या वस्तूंची निर्यात करणे आवश्यक असून जिल्हयातील काही उत्पादने सदर नियमांतर्गत बसू न शकल्याने जिल्हयाची निर्यात चालू आर्थिक वर्षात कमी झाल्याचे दिसून येते असे श्री.अमोल मोहिते, निर्यात एक्सपर्ट यांनी सांगितले. तरी जिल्हयातील इतर निर्यातक्षम असलेल्या वस्तूंची निर्यात वाढविण्यास जिल्हयातील निर्यातदारांनी भर द्यावा असे आवाहन त्यांनी केले. याबाबत काही अडचणी असल्यास जिल्हा उद्योग केंद्र तथा डीजीएफटी यांचेकडे संपर्क साधावा असे सूचित केले.

जिल्हयातील सेलू तालुक्यातील निर्यातदार मे.कोहीनूर रोप्स या उद्योग घटकास उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई यांचे मार्फत सन २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षाचा उत्कृष्ट निर्यातदार पुरस्कार मिळाला आहे. त्याबाबत त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

शेवटी सभेस उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून मा.अध्यक्षाचे परवानगीने सभा संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

महाव्यवस्थापक
तथा सचिव,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती, परभणी

जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती,परभणी